**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १९९/१९९५ मधील नि. ३११ वरील आदेश</u>**

*(लक्ष्मण रभाजी वाघ विरुध्द रंगनाथ रभाजी वाघ व इतर)*

सदरचा अर्ज मयत प्रतिवादी २ व ३ हे मयत असुन त्याप्रमाणे दाव्याची वंशावळीत दुरुस्ती होणेकरिता दाखल केला आहे.

०२. वादी यांनी सदरचा अर्ज दाखल करुन असे कथन केले आहे की, सदर दाव्यात प्रतिवादी क्र. २ व ३ हे मयत असुन त्यांचे वारस नि. २५८ व २८० अन्वये रेकॉर्डवर घेतलेले आहेत. तसेच, प्रतिवादी क्र. ३ चे वारस प्रतिवादी क्र. ३/१ व ३/२ हे देखील मयत झाले असुन त्यांचे वारस देखील रेकॉर्डवर घेतलेले आहे. येणेप्रमाणे दाव्याच्या वंशावळीत खालील प्रमाणे दुरुस्ती करणेकरिता सदर अर्ज दाखल केला आहेः–

गोपिनाथ (मयत) प्रतिवादी क्र. २
रामजी (मयत) प्रतिवादी क्र. ३

अंजनाबाई (पत्नी)(हयात)
चंद्रभागा (पत्नी)(हयात)

भागुबाई सुखदेव प्रतिवादी क्र. २ब
ताराबाई अशोक प्रतिवादी क्र. २क
सुनिता नारायण प्रतिवादी क्र. २ड
श्रीहरी गोपिनाथ प्रतिवादी क्र. २इ
संगीता प्रतिवादी क्र. २ई

केशव (मयत)
माधव (मयत)
जनाबाई भाउसाहेब दातीर
मिना कोंडाजी कोल्हे
महिंद्रा रामजी वाघ

सजाबाई (पत्नी) प्रतिवादी क्र.३–२उ

दामोधर माधव प्रतिवादी क्र.३–२इ
अमोल माधव प्रतिवादी क्र. ३–२ई
सुर्वणा संदिप ३–२ऊ
काजल कृष्णा ३–२ए

मंदा केशव (पत्नी) प्रतिवादी क्र. ३–१क

चांगदेव केशव प्रतिवादी क्र. ३–१अ
योगेश केशव प्रतिवादी क्र. ३–१ब
सविता गणपत प्रतिवादी क्र.३–१ड

**०३.** तसेच, नि. ६४, नि. २२८, नि. २५८, नि. २८० वर दावा दुरुस्त केलेला आहे. त्याप्रमाणे दाव्यात नि. १ वर वेळोवेळी अमेंडमेंड अर्जाप्रमाणे दुरुस्ती केलेली आहे व त्याप्रमाणे फिर्याद अर्जी दुरुस्ती दाव्यात दाखल केलेल्या आहेत. शेवटची दुरुस्ती झाल्यानंतर दि. २५/०४/२०२४ रोजी दाखल केलेल्या फिर्याद अर्जीत नि. ६४ व नि. २२८ च्या दुरुस्तीचा मजकुर येणे दाव्याच्या हुकुमनाम्यासाठी आवश्यक आहे. त्याप्रमाणे वंशावळीसोबतच नि. २२८ च्या अमेंडमेंडप्रमाणे ८ब मजकुर टाईप करावयाचा राहुन गेला. सबब, वंशावळी बरोबर नि. २२८ च्या दुरुस्तीतील मजकुर ८ब त्यात टाकण्यास व प्रतिवादी क्र. ५ म्हणुन शरद इंद्रभान कांडेकर हे टाईप करुन नवीन दुरुस्त फिर्याद अर्जी दाखल करण्यास परवानगी मिळावी. सदर दुरुस्त्या या नजरचुकीने राहुन गेल्या असल्याने वरील प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

**०४.** सदर अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे की, दावा चालु असतांना मयत झालेल्या व्यक्तींचे वारस घ्यावयाचे असतात ते वादीने दिलेले आहे. त्यामुळे पुन्हा वंशावळ आवश्यक नाही. वादींनी सदरचा अर्ज जाणीवपुर्वक दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने दिलेला आहे. सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली. तसेच, प्रतिवादी क्र. ३ यांनी निशाणी ३१३ अन्वये म्हणणे  दाखल करुन सदर दुरुस्ती मुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत असल्याने सदर दुरुस्तीची मागणी कायदेशीर नाही असे कथन करुन वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. तसेच, प्रतिवादी क्र. १ चे वारसांनी निशाणी ३१४ अन्वये म्हणणे दाखल करुन अर्जात नमुद केलेली वंशावळ चुकीची असुन वादीचा अर्ज  संधिग्ध असल्याने सदरचा अर्ज रद्द करावा अशी विनंती केली.

**०५.** सदर अर्जाकामी वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर दाव्यामध्ये यापुर्वी निशाणी ६४, निशाणी २२८, निशाणी २५८ व  निशाणी २८० अन्वये वेळोवेळी दुरुस्ती झाली आहे. परंतु, निशाणी २२८ वरील दुरुस्ती नुसार प्रतिवादी क्र. ५ शरद इंद्रभान कांडेकर यांना दाव्यात सामिल करुन

तसेच, दाव्यामध्ये '८ब' हा मजकुर समाविष्ठ करण्याबाबत दुरुस्ती मंजुर झाली असतांना दुरुस्त दाव्याच्या प्रतीमध्ये प्रतिवादी क्र.५ यांचे नाव व '८ब' मधील मजकुर अनावधानाने नमुद करण्याचे राहुन गेले असे दिसुन येते. तसेच, निशाणी ६४ वरील आदेशाप्रमाणे दुरुस्ती करतांना दुरुस्त दाव्याच्या प्रतीमध्ये परिच्छेद  क्र. '८अ' असे नमुद करण्याचे राहुन गेल्याचे देखील दिसुन येत आहे. तसेच, वेळोवेळी दाव्यातील पक्षकारांचे वारस अभिलेखावर घेतल्यानंतर दाव्यामध्ये व वाद कथनामध्ये स्पष्टता येण्यासाठी त्यानुसार वंशावळ नमुद करुन सदर अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती केल्यास प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही व दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची आहे. सदरची दावा दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहेः–

## आदेश

१. अर्ज (**नि.३११**) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादींना खर्च रु. ५००/– देवुन दाव्यात विनाविलंब दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

३. वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2025.07.23 15:01:50 +0530

संगमनेर

दि.२२/०७/२०२५.

( श्रीमती एस. बी. ढवळे )

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.